म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का वा
दा. क्र. २६२२

२६२२

२६२२

# नंदनवन

IRBK-0102622
IRBK-0102622

# दनवन

ग्रं. सं. ठाणें
पा. नं. ८४०



विजय प्रकाश

# नंदनवन

तु. ता. सावंत,

किंमत चार आणे

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रन्थालय शाखा.

IRBK-0102622

विजय प्रकाशन—मुंबई

: प्रकाशक :
एस्. एन्. सारंग,
बी. आय्. टी., चाळ नं. ४,
परळ, मुंबई, नं. १२.

आवृत्ती पहिली १९४७

: मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

बा-वा.
५४०

# नंदनवन

( चाल—निजल्या तान्ह्यावरी...... )

सुंदर जग आपुलें। खरोखर नंदनवन शोभलें ॥ ध्रु० ॥
वरी निळें आकाश पसरलें,
सूर्य-चंद्र-तारांनीं नटलें,
पुष्पांनीं हे बाग बहरले,
मोहक जग बनलें। खरोखर नंदनवन शोभलें ॥
खळबळ करुनी नदी वाहते,
निर्झर झरझर करती येथें,
निळ्या सागरीं जल सळसळतें,
जग रम्य रम्य अपुलें। खरोखर नंदनवन शोभलें ॥
डोंगरमाथीं ढग हे बसले,
उंचउंच हे वृक्ष विखुरले,
पक्षि गात या वनीं बैसले,
जग गोड किती रंगलें ॥ खरोखर नंदनवन शोभलें ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नों. क्र. १५०६४
१७७१५३

# ढगांचें गाणें

( चाल—झिम्मा खेळूं ये... )

दंगा करुंया। या, दंगा करुंया.
लाडक्या या मुलांसंगे दंगा करुंया.
अंगीं घाला काळे झगे,
राहूं नका कोणी मागें,
जमूनिया आकाशांत दंगा करुंया.
काळोखानें जग झांकूं,
आतां थोडे खालीं वांकूं,
हांसऱ्या या मुलांसंगें दंगा करुंया.
पक्षी गेले घरट्यामधीं,
मुलें आलीं रस्त्यामधीं,
'गुडुम् गुडुम्' आवाजानें त्यांना भिववूंया.
आम्हां पाहुनीया वर,
थय्‌थय् नाचती हे मोर,
खेळणाऱ्या मुलांची ह्या, जम्मत करुंया.
इवलीं इवलीं मुलें खालीं,
'ये, ये, पावसा, बोलत आलीं,
चूळ टाकूं त्यांच्या शिरीं, त्यांना भिजवूंया.

बा-वा-
५४०

# ऊठ, ऊठ, माझ्या बाळा।

( चाल—अंगाईची )

ऊठ, ऊठ, माझ्या बाळा । रविराज उगवले
—बघ, किती उजाडलें ॥
चिऊकाऊ जागीं झालीं । चिमण्या, तूं जागा हो ना
—दांत घास, चल, स्नाना ॥
पानेंफुलें जागीं झालीं । ऊठ, माझ्या गोड फुला,
—कांहीं खाऊ देतें तुला ॥
वारा झुळूझुळू वाहे । झोंप आतां पुरे बाळा,
—चल, लाग अभ्यासाला ॥
ऐक, गाई हंबरती । उघड, तूं गोड डोळे,
—बघ, उठले सगळे ॥
ऊठ, ऊठ, माझ्या बाळा । माझें सोनुलें उठलें,
—मन माझें आनंदलें ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५०९४
ता. ८/११/५३

# तारकांची शाळा

( चाल—ये, ये, ताई, पहा, पहा.....)

रात्र पसरली चोहिंकडे । तारा येती पुढें पुढें.
लोक चालले घराकडे । तारांची शाळा उघडे.

तारा सजल्या,
नटून बसल्या,
खुद्कन हसल्या,

चंद्रराज येतील गडे । तारा मग घेतील धडे ॥
ह्यांना मास्तर आवडती । त्यांच्याभोंतीं ह्या जमती.
गोड किती ह्या हसतात । कुठेंतरी हो, बसतात.

हौस तरि किती,
रात्रीं येती,
शिकण्यासाठीं.

नाहीं कसली भीति गडे । आपआपुले घेति धडे ।

# डोंगर पहारेकरी

( चाल—जरा तरी बघ हसून...... )

डोंगर राखण करी । पहा, हा डोंगर राखण करी ॥ध्रु०॥

घरासमोर माझ्या उभा,
ही सुरेख दिसते शोभा,
जणुं हा गांवचा पहारेकरी । पहा, हा डोंगर राखण करी
हा भिडला आकाशाला,
टोपीच नसे डोकीला,
हिरवें अंगांत कायसें तरी । पहा, हा डोंगर राखण करी
नाहीं हसत बोलत कधीं,
राही उनांत पावसामधीं,
किती दिवस उभा हा तरी । पहा, हा डोंगर राखण करी
उभा राहून दमला किती !
घामाच्या धारा वाहती !
नदी-झरेच हे खरोखरी । पहा, हा डोंगर राखण करी ॥

# समुद्रावरचे शिपाई

( चाल—राजहंस माझा निजला...... )

हीं नव्हेत नारळझाडें । हे शूर शिपाई खडे ।।ध्रु०
हा निळा पसरला दर्या । याच्यांत कितीतरी मोतीं ।
रत्नांनीं हा भरलेला । रत्नाकर याला म्हणती ।
ही उघड्यावर पडलेली । सृष्टीची थोर संपत्ती ।
ही संपत्ती राखाया,
चोरांना शिक्षा द्याया,
का खरोखरी फौजा ह्या ?
हीं उभीं राहिलीं झाडें । हे शूर शिपाई खडे ।।

# चला, सूर्यचंद्र धरण्याला–

( चाल—चला सुटी झाली... )

अहो जाऊं चला, सूर्य-चंद्र धरण्याला ॥ ध्रु० ॥

समोर डोंगरावरी,
आहे त्यांची नगरी,
भाकर बांधुन घेऊं न्याहारीला—
दमेपर्यंत हवं चालायला ॥ अहो ॥

लाडू चला घेऊन,
जाऊं होडी घेऊन,
जाउं समुद्राच्या सीमेला
हवं खूप दूर जायाला ॥ अहो ॥

इंद्रधनुष्यांतून,
त्याच्यावरी बसून,
हवं खूपखूप धांवायला,
हवं आभाळांत जायाला ॥ अहो ॥

# खोडकर वारा

( चाल—सरकसवाला मी मौज...... )

आई, आई । हा वारा कोठें राही ? ॥ ध्रु० ॥

जिकडे जातें तिकडे असतो,
हळूच हलवून मजला जातो,
परि मजला हा कसा न दिसतो ?
लबाड ग बाई । हा वारा कोठें राही ?

भुरुभुरु माझे केस उडवितो,
बाळाचीहि टोपी पळवितो,
'भेळ' कधींकधिं उपडी करतो,
चलाख ग बाई । हा वारा कोठें राही ?

लहान मोठीं झाडें हलवी,
शीडाचीं जहाजें चालवी,
शोधूं कोठें याला, आई ?
खोडकर बाई । हा वारा कोठें राही ?

अ.फर्ण- ५८०

# माळीण मी आलें!

( चाल--दिपवाळी आली...... )

माळिण मी आलें। मुलींनो, माळिण मी आलें ॥ध्रु०॥

बहुरंगी ही परडी माझी—हींत काय भरलें ?
घेउन आलें फुलें आणखी तऱ्हेतऱ्हेचे कळे ॥
बघा, पांढरीं, लाल, गुलाबी, हिरवीं मधुर फुलें ॥
गुलाब, जाई, जुई, मोगरा पाहुनि मन भुललें ॥
हिरवा चांफा, सुरंगी यांनीं मन माझें भरलें ॥
तऱ्हेतऱ्हेचे गजरे घ्या हे हिरवे नी पिवळे ॥
कोमल प्राजक्ताचे सुंदर हार तुम्हां आणले ॥
जाइजुईच्या वेण्यांवरतीं लावा हो, डोळे ॥
वेण्या, गजरे, हार विकुनिया पहा, घरीं चालले ॥

म. ग्रं. सं. ठाणे. ग्रन्थालय शाखा. ११/१५०६
बा. क्र. ... २९२२ . नों दि ...........
वि. ........ वा क्र. ................

## चांदण्यांचें गाणें

( चाल—चला सुटी झाली… )

चला रात झाली, आतां खूप खूप नाचायचं ॥ध्रु०॥
दिवे मालविले, लोक झोंपी गेले,
हळु सर्वांनिं पुढं सरायचं–
हळु सर्वांनिं गोलट् फिरायचं ॥ चला० ॥
वायु थंडावला, काळोख आला आला,
नाहिं आम्हांस कुणी पहायूचं–
नाहिं आम्हांस कुणी ओळखायूचं ॥ चला० ॥
आतां झिम्मा नाचूं, अन् फुगडी घालूं,
नाहिं कोणास कुणी ढकलायूचं–
नाहिं कोणास कुणी बोलायूचं ॥ चला० ॥
देवकन्या आम्ही, खेळ खेळूं नामी,
परि नाहींच कुणी दमायूचं ॥ चला० ॥
परि नाहींच कुणी हरायूचं ॥ चला० ॥
आम्ही फुगडी घातली, दुनिया जागी झाली,
हळु सर्वांनिं आतां लपायूचं–
हळु सर्वांनिं आतां पळायूचं ॥ चला० ॥

# आम्ही कवाईत करणार !

( चाल—गुणी आणि अवगुणी...... )

अम्ही शूर सरदार । आम्ही कवाईत करणार ॥ध्रु०॥

बिगुलाचा हा आवाज आला,
चला, चला रे, कवायतीला,
एकामागें एकाचि चाला,
रांगेंत अम्ही चलणार । आम्ही कवाईत करणार ॥

चार चारच्या रांगा करुनी,
हातानें अंतर घेवोनी,
शिस्तीमध्यें उभे राहुनी,
अम्ही गीत गाणार । आम्ही कवाईत करणार ॥

सेनापती हा नंबर पहिला,
हुकूम देइल तो आम्हांला,
जल्दी जल्दी चालायाला,
'झरझर् अम्ही चलणार । आम्ही कवाईत करणार ॥

# गुणी बाळ

( चाल—हौद चिमुकला होता सुंदर... )

राव सावळी होती सुंदर ।
दिवे लागले नभीं मनोहर ॥
छोटा बाबू पाहुनि तारे ।
एकएक तो मोजी सारे ॥
दमला, मग तो पुसूं लागला—
" जन्म कसा ताऱ्यांचा झाला ? "
" मुलें चिमुकलीं तुझ्यासारखीं—
खरें बोलतां ते अवतरती ॥ "

* * *

एके रात्रीं गंमत झाली ।
बाबू बसला तुळशीखालीं ॥
खळकन् वरुनी तारा पडला ।
बाबू धावुन मला बिलगला ॥
" दादा, दादा ! " " काय जाहलें ? "
" तारा पडला ! "—अश्रु गळाले "
" अमुच्या गांवीं, "--बाबू वदला,--
" बाळ कुणितरी असत्य वदला ! "

# गड्या, मी विमान चालविणार !

( चाल—गुणी आणि अवगुणी... )

वैमानिक होणार। गड्या, मी विमान चालविणार ॥
सुंदर कपडे मिळतील मजला,
मोठा चष्मा लाविन डोळां,
बांधिन पट्टा अन् कानांला,
विमानांत बसणार। गड्या, मी विमान चालविणार ॥
उंच उंच जाईन भरारा,
भेदिन मी मेघांच्या माला,
पाहिन भूतल सुंदर सारा,
जग सारें फिरणार। गड्या, मी विमान चालविणार ॥
जगास दाविन खूप दरारा,
धूराचा सोडीन फवारा,
पडेल माझ्या मागें वारा,
कोण मला धरणार ! गड्या, मी विमान चालविणार ॥
स्वतंत्र देशाचा वैमानिक
जयहिंदाचा प्यारा पाइक
भारतमातेचा मी बालक,
जगा थक्क करणार। गड्या, मी विमान चालविणार ॥

# तिन्हीसांज ही आतां झाली

( चाल — सरकसवाला मी मौज... )

या रे या रे । सोबती, चला, या सारे ॥ ध्रु०
तिन्हीसांज ही आतां झाली,
सोन्यानें मावळती नटली,
पडलि छानशी गार सावली,
मारूं मौजा रे । सोबती, चला, या सारे ॥
'कवडा' घाली साद कुणाला ?
'कुक्कुच कू' कोंबडा बोलला,
पक्ष्यांचा हा मेळा आला,
गात गाणीं रे । सोबती, चला, या सारे ॥
पहा, वांसरें हीं हंबरतीं,
मुलें आईला हांक मारतीं,
मोत्या–चंपी 'भूभू' करती,
नाचुंया या रे । सोबती, चला, या सारे ॥
आम्ही सारे मित्र जमूनी,
खळ्यांत पेळेवरतिं बसूनी,
आणि गोडसा सूर धरोनी,
गाउं गाणीं रे । सोबती, चला, या सारे ॥

क्र. २६२२

IFE# 0102622
IRBK-0102622